साप्ताहिक चतुरस्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : २४
• पाने : ८
पुणे

मूल्य ६/-

www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

प्रति,

■ सोमवार, दि. १० ते १६ ऑगस्ट २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | PRGI No. MAHMAR/2011/35979

# हडळीला नाही नवरा आणि खवीसाला नाही बायको!

**'भारतीय राजकारणाच्या अविश्वासाचे जनक' अशी ओळख असलेल्या शरद पवार यांच्या आठ खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आहे. विविध विकासकामासंदर्भात ही भेट घेतल्याचे या पक्षाकडून सांगण्यात येत असले तरी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट मतदारसंघ पुनर्रचना विधेयक पुन्हा संसदेत मांडले तर एनडीएला पाठिंबा देणार असल्याची चर्चा आहे. 'देशात कोणीही कुणालाही भेटू शकतं. पंतप्रधानांना भेटून आपल्या मतदारसंघातील कामे करून घेण्यात गैर काय? मुख्यमंत्री या नात्यानं मलाही विरोधी पक्षातील अनेक जण भेटून त्यांच्या अडचणी सांगत असतात,' असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**





संपादकीय
घनश्याम पाटील
७०५७२९२०९२

कोणीही कोणालाही भेटू शकतं, हे फडणवीसांचं म्हणणं अगदी रास्त असलं तरी कोणीही कोणासोबतही जाऊ शकतं, हे सुद्धा सध्याच्या राजकीय परिस्थितीत वास्तव आहे. माजी मुख्यमंत्री आणि अभ्यासू नेते अशी ओळख असलेले पृथ्वीराज चव्हाण या भेटीबाबत म्हणाले की, 'मी जरी विरोधी पक्षात असलो तरी सत्ताधारी पक्षातील अनेक नेते मला सांगतात की पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आम्ही फोडणार!' असं जर असेल तर मग सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली या आठ खासदारांचं मोदींना भेटणं हे फक्त मतदारसंघाच्या 'पॉलिसी मेकिंग' संदर्भापुरतं मर्यादित राहत नाही.

गेल्या काही काळात पंतप्रधान मोदी यांनी डीएमसीतून फुटलेल्या वीस खासदारांची भेट घेणं असेल, शिवसेनेच्या खासदारांची भेट असेल किंवा राष्ट्रवादी काँग्रेसच्या या खासदारांची भेट असेल या प्रत्येक घटनेवरून तर्कवितर्क लावले गेले. आपल्या कन्येच्या भल्यासाठी पवार काहीही करू शकतात, असे सांगितले जात आहे. तसे जर काही विपरित घडलेच तर पवारांच्या उतरत्या काळात त्यांची जी काही थोडीफार अब्रू आहे, तिही संपुष्टात येईल. देशभर विद्यार्थी आंदोलन पेटलेले असताना अभिजित दिपकेची भेट घेणे, त्याच्या दुसऱ्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटून येणे, त्या भेटीबाबत कमालीची गुप्तता पाळणे, पंतप्रधान कार्यालयातून त्याबाबत समाजमाध्यमांवर बातमी आल्यानंतर 'आपण पंतप्रधानांना विद्यार्थ्यांशी संवाद साधायला सांगितल्या'चे सांगणे या सगळ्यातून पवारांचे 'मरेपर्यंत राजकारण' हे नेहमीचे धोरण दिसून येते. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली मोदींना भेटायला गेल्यावर पंतप्रधानांनीही आधी पवारांच्या तब्येतीची विचारपूस केली आणि त्यांची कार्यशैली आणि ऊर्जा याचे कौतुक केले.

गेले पंधरा दिवस विरोधी पक्षांनी गोंधळ घालत सभागृहाचे काम बंद ठेवल्याने पंतप्रधानांना आमच्या कामाची, समस्यांची माहिती द्यायला गेलो असं या खासदारांनी सांगितलं. मुळात तुम्ही सभागृहाचे काम बंद का ठेवता? हाच प्रश्न आहे. जे प्रश्न सभागृहात मांडायला हवेत त्यासाठी पंतप्रधानांच्या खासगी भेटी घेणं यातून यांची विकासकामांच्या दिखाव्याची तळमळ दिसून येते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना भारतरत्न द्या, अशी मागणी पंतप्रधानांकडे केल्याचे हे खासदार सांगतात. सुरेश म्हात्रे म्हणाले, 'मुंबई विमातळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे अशी मागणी पंतप्रधांकडे केली.' 'उजणी धरणातून बीडला पाणी मिळावं' अशी मागणी बजरंग सोनवणे यांनी केली. 'पुणे-नाशिक रेल्वे प्रश्नावर चर्चा केल्याचं' अमोल कोल्हांनी सांगितलं. या सगळ्या समस्या महत्त्वाच्या असल्या तरी पंतप्रधानांच्या भेटीचे 'टायमिंग' चुकले का? असा प्रश्न विचारला जात आहे.


गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात अनेक उलथापालथी घडल्या. एकनाथ शिंदे यांनी बंड करत शिवसेना हा पक्ष फोडला. त्या पाठोपाठ अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला भगदाड पाडले. या सगळ्या फोडाफोडीच्या घटनांमुळे चर्चांना उधाण आले. 'या वयात शरद पवारांना किती त्रास होत असेल?' याच्या कहाण्या रंगवण्यात आल्या. यापूर्वी खुद्द पवारांनी मात्र काय प्रताप केले हे सहसा कोणीही सांगत नाही. शरद पवारांनी वसंतदादा पाटलांच्या पाठित खंजीर खुपसला. ज्या यशवंतराव चव्हाणांना ते आपला गुरू मानतात त्या यशवंतरावांपासून ते फुटून वेगळे झाले. शिंदेंनी जसं बंड केलंय तसंच काहीसं बंड त्याकाळी पवारांनी केलं. या कृतिमुळे दुखावल्या गेलेल्या, अतियश अस्वस्थ झालेल्या यशवंतराव चव्हाणांनी एक लेख लिहिला होता. भावनिक साद घालणाऱ्या त्या लेखाचं शीर्षक होतं, 'या चिमण्यांनो परत फिरा रे...' पवारांनी तो लेख वाचल्यावर ताबडतोब त्याला उत्तर दिलं. त्यांच्या प्रतिलेखाचं शीर्षक होतं, 'परतीचे दोन केव्हाच कापून टाकलेत.'

आज हेच पवार आणि त्यांचे चमचे पक्षफुटीरून गळे काढतात. 'करावे तसे भरावे हा नियतीचा नियम नियती न मानणाऱ्या पवारांना मानावाच लागेल,' याची साक्ष देणाऱ्या अनेक घटना गेल्या काही काळात घडल्या. केवळ त्यांच्या वयाचा आदर राखत त्यांनी केलेल्या पापांवर बोलायचेच नाही, असे केले तर ते अन्यायकारक ठरेल. आज ज्या जातीय अस्मिता टोकदार झाल्यात, माणसा-माणसात जे भेद निर्माण झालेत त्याचे श्रेय पवारांकडे जाते. जातीय मेळाव्यांची सुरुवात करून त्यांनी कायम अशा गोष्टींना प्रोत्साहन दिले. ब्राह्मण, मराठा, दलित, माळी, वंजारी, धनगर असे संघर्ष उभे केले. त्यांच्या या स्वार्थी धोरणांमुळे किती तरी पिढ्या बरबाद झाल्या. अजूनही त्यांच्या या खेळ्या थांबत नाहीत आणि त्यातून अशा गाठीभेटी सुरू राहतात. 'कायम तेल लावलेला पैलवान', 'मैद्याचं पोतं', 'बारामतीचा म्हमद्या' अशा तिखटजाळ शब्दात ज्या बाळासाहेब ठाकरे यांनी कायम पवारांची निर्भत्सना केली त्यांचेच वंशज आज पवारांना गुरू मानतात, हा दुर्दैवी योगायोग म्हणावा लागेल.

शरद पवार एनडीएसोबत गेले तर कदाचित काहींना आश्चर्य वाटेल! पण यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. 'हडळीला नाही नवरा आणि खवीसाला नाही बायको' अशी गत शरद पवारांचा राष्ट्रवादी आणि 'पार्टी विथ डिफरेंस'चा आव आणणाऱ्या भाजपची झालीय. आज देशात प्रबळ विरोधी पक्षच राहिला नाही. त्यामुळे काहीही करून सत्तेचे लाभ पदरात पाडून घ्यायचे आणि जेवढे घर भरून घेता येईल तेवढे भरायचे, असेच सर्वांचे धोरण दिसते. तत्त्व, मूल्ये, विचारधारा, बांधिलकी हे सगळे कोसो मैल दूर गेले. सत्तेत कोणीही असले तरी फार तर 'दगडापेक्षा वीट मऊ' इतकाच काय तो फरक! ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बळावर देशावर राज्य केले त्या 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आता आम्हाला गरज नाही,' असं सांगण्याइतपत भाजपची मजल गेली आणि तिथूनच खऱ्याअर्थी या पक्षाचे अधःपतन सुरू झाले. महाविकास आघाडीचे घटक शरद पवार यांच्यासारख्या बुजूर्ग नेत्याला आपला 'बाप' मानतात आणि दरवेळी तोंडघशी पडतात. पदावर असताना शरद पवारांनी कोणती कामे केली? यावर अनेकदा चर्चा होते. त्यांचे योगदान नाकारताही येत नाही! पण त्यामुळे त्यांच्या चुकांकडे दुर्लक्षही करता येणार नाही. 'मोदी किंवा पवारांचे फोटो नोटांवर छापा' अशी मागणी करण्यापर्यंत या दोन्ही पक्षात त्यांचे त्यांचे लाभार्थी भक्त आहेत. कदाचित हे घडूही शकतं. मागे एकदा बाळासाहेब ठाकरे यांना विचारलं गेलं होतं की, 'छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो नोटांवर छापायला हवा का?' त्यावेळी ते क्षणाचाही विलंब न करता म्हणाले होते, 'कशाला? या नोटा कुठं कुठं चालतात ते बघितल्यावर तिथं गांधीच ठीक आहे. महाराजांना हे सहन होणार नाही.' म्हणूनच नोटांवर पवार किंवा मोदी आले तरी आश्चर्य वाटणार नाही. आपण 'देश' म्हणून मात्र कमी पडतोय, हे सातत्यानं विविध घटनांतून दिसून येतंय आणि हे देशाला कमीपणा आणणारेच आपल्याला नैतिकता शिकवत असतात.

शरद पवार नेहमी सांगत असतात की, 'आम्ही राजकारणी आहोत, संत नाही. त्यामुळे संतासारख्या अपेक्षा आमच्याकडून ठेवू नका!' इतकी स्पष्ट भूमिका मांडूनही पवारांचे खासदार मोदींना भेटले म्हणून चर्चा होत असेल आणि या दोन्ही नेत्यांकडून, त्या दोघांच्याही पक्षांकडून आपण काही अपेक्षा ठेवत असू तर ती आपलीच चूक आहे. 'तुका म्हणे उगी राहावे, जे जे होईल ते ते पाहावे' इतकेच तूर्तास आपल्या हातात आहे. ■■

# शोषित समाजांचे शोषण का होते?



संजय सोनवणी
साहित्यिक आणि संशोधक
७७२१८७०७६४



**सुख-दुःखे प्रत्येकालाच असतात. किंबहुना मानवी जीवनाचा तो अविभाज्य हिस्सा आहे. माणूस जसा प्रगल्भ होत जातो तशा सुख-दुःखाच्या व्याख्या मात्र बदलत जातात. काल ज्याचे दुःख वाटत होते त्याचे आता दुःख वाटत नाही. सुख-दुःख हे शेवटी मानवी भावना व विचारांशी जोडले गेले असल्याने व्यक्तिनिहाय त्याच्या वेगळ्या व्याख्या असणे, प्रगल्भतेबरोबर त्या बदलत जाणे स्वाभाविक आहे. समाज व राष्ट्रांनाही हे लागू पडते कारण समाज हा व्यक्तिंमुळेच बनतो. सामूहिक भावना व सामूहिक विचारांचे अस्तित्त्व हे सदासर्वकाळ असते. त्यामुळे माणसात आपसूक विविध गटही पडत जातात व विविध गटांतील संघर्षही अविरत सुरु राहतो.**

हा संघर्ष जोवर सामाजिक विचार-उन्नतीला सहाय्य करतो तोवर तो मानवजातीला उपकारक आहे असे म्हणता येते पण अनेकदा हा संघर्ष द्वेष-हिंसेच्या दिशेने जाऊ लागतो आणि आपलेच खरे, पुरातन आणि श्रेयःस्कर या सम जूतीच्या अट्टहासातून सामाजिक, राष्ट्रीय व अनेकदा जागतिक शांतताही निखळून पडते हे जगाच्या इतिहासावर नुसती नजर फिरवली तरी आपल्या लक्षात येते. या भावनांच्या खेळात अनेकदा मानवी मूल्यांचे खरे प्रश्न बाजूला पडतात. आपण येथे भारतातील शोषित-वंचित समाजाचे उदाहरण घेतले तर हे लक्षात येईल की प्रत्येक विचारगट वरकरणी या समाजाबाबत सहानुभूती बाळगत असल्याचे दाखवतो. तो समाजवादी असेल, साम्यवादी असेल किंवा धर्मवादी. किंबहुना शोषित हा शोषितच नसून त्याच्या गतजन्माच्या पापांचे फळ आहे या मान्यतेचा प्रभाव धर्मवाद्यांच्या मस्तकातून अजूनही गेलेला नाही, भले ते वरकरणी काहीही म्हणत असोत. समाजवादी व साम्यवादी तर शोषितांचेच प्रतिनिधी असल्यासारखे वारंवार त्यांच्या बाबतच बोलत असतात, लिहित असतात व चर्चासत्रे घडवून आणत असतात. सत्तेत आले तरीही ही भाषणबाजी थांबत नाही.

शोषित-वंचित समाजांसाठी असंख्य योजना जाहीर होतात, लक्षावधी कोटी रुपये खर्च केल्याचे दाखले व पुरावे दिले जातात पण वास्तव हे आहे की शोषितांचे शोषितपण थांबल्याचे चित्र मात्र आपल्याला दिसून येत नाही. उलट शोषितांच्या शोषणाचे नवनवे मार्ग शोधले जातात. समाजवादी या तत्त्वाला अपवाद नाहीत. किंबहुना शोषित-वंचित हेच त्यांचे सत्तेत येण्याचे मुख्य भांडवल असल्याने शोषिताला थोडी मदत केल्याचे अवसान आणत त्यांना शोषितच ठेवण्याचे कट आखले जातात. व्यक्तिने आपल्या मगदुराने सुख-दुःखाची व्याख्या करता येण्याऐवजी त्यांच्या सुख-दुःखाचे एक मोठे कारण बनण्याचा प्रयत्न राजसत्ता व अर्थसत्ता करत जाते कारण दुःखाचीच बाब तीव्र राहण्यात त्यांचे स्वार्थ अडकलेले असतात. शोषित-वंचित मात्र भावनिक होत अनिवार आशेने कोणाचा तरी स्वीकार करतात वा कोणाच्या तरी विरुद्ध होतात.

यासाठी अगदी सोपी क्लृप्ती जगभर वापरली गेली आहे. धर्मवादी व वंशवादी दुसऱ्या धर्माला अथवा वंशाला शत्रू घोषित करत, त्याचे काल्पनिक भय निर्माण करत आपल्या धर्मात एकजूट निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. कधी जातीही याच अजातीय कार्यासाठी वापरल्या जातात. समाजवादी/साम्यवादी भांडवलदारांना क्रमांक एकचा शत्रू घोषित करतात व श्रमिक-मजदुरांची एकजूट करायचा प्रयत्न करतात. म्हणजे कोणता तरी खरा-खोटा शत्रू अस्तित्वात असल्याखेरीज या गटांचे अस्तित्त्वच राहत नाही पण यामुळे शोषण थांबलेले नसते. भांडवलशाहीला विरोध करणारे राष्ट्राची मक्तेदारीयुक्त भांडवलशाही मानत असतात आणि नेमके हेच लोकांच्या लक्षात येऊ दिले जात नाही. किंबहुना व्यक्तिचे स्वातंत्र्य अधिकाधिक संकोच कसे पावेल हेच राजसत्ता व अर्थसत्ता पाहत असतात. स्पर्धेचे आवाहन ते करतात पण त्यांना स्पर्धाच संपवायची असते. शोषित-वंचित घटक स्वप्रेरणेने व स्वसामर्थ्याने शोषिततेच्या, वंचिततेच्या बाहेर पडावेत यासाठी मात्र कसलाही कार्यक्रम त्यांच्याकडे नसतो. सुख-दुःखे एकाच परिघात येऊन साचतात आणि त्यात प्रवाहीपणा येण्याची शक्यताच पुरती मावळून जाते. भारतातील शोषित जाती-जमातींच्या आजही असलेल्या दुखण्यांचे नेमके हेच कारण आहे आणि ते सांगणे अंगलट येणारे असल्याने या विचारधारांचे समर्थक मूग गिळून गप्प बसणार हे उघड आहे.

भटक्या-विमुक्त समाजाचा अभ्यास करून त्यांच्या भल्यासाठी उपाययोजना सुचवायला सरकारने रेणके आयोग नेमला होता हे सर्वांच्या लक्षात असेलच. या आयोगाचा अहवाल अनेक वर्ष अभ्यास केल्याचे दाखवुनही अनेक त्रुटींनी भरलेला असल्याने तो अहवाल फेटाळला जाणार हे स्पष्टच होते. भाजप सरकार आल्यानंतर पुन्हा नव्याने इदाते आयोग नेमला गेला. हाही अहवाल सरकारने अमान्य केला. म्हणजे आयोगाचे गाजर दाखवत किमान दीड दशक घालवले गेले आणि अहवालच मुळात त्रुटीपूर्ण असल्याने सरकारने कोणतीही शिफारस मनावर घेतली नाही. याबद्दल या आयोगांवर कसलीही कारवाई झालेली नाही. सरकारचे पैसे मात्र वाया गेले. तसाच वेळही गेला. भटक्या-विमुक्तांची स्थिती मात्र तीळमात्र बदलली नाही.

मुळात अनेक गोष्टी अशा आहेत की ज्यासाठी आयोगाची गरजच नाही. धोरण ठरवण्याची गरज आहे व त्यासाठी आवश्यक असलेला डाटा सरकारकडे आहेच. आपापल्या मागण्या भटक्या-विमुक्त समाजातील विचारवंत ते नेत्यांनी वेळोवेळी मांडल्या आहेतच. शिक्षण, आरोग्य, आर्थिक उन्नतीसाठी नवी व्यावसायिक कौशल्ये देणारी विशेष व्यवस्था, वित्तसहाय्य आणि सामाजिक जीवनात त्यांना देण्यात येणारी वागणूक बदलण्यासाठी न्याय्य व्यवस्था या काही बाबी ठोसपणे प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारला आयोगाची काय गरज आहे? आरक्षणविषयकचे प्रश्न सोडवायची इच्छा नसली समजा तरी अन्य प्रश्नांना हात का घालता येत नाही? त्यांच्यात स्वतंत्र अर्थप्रेरणा, समाजप्रेरणा निर्माण करण्यासाठी जे खुले वातावरण हवे ते का निर्माण केले जात नाही? किंबहुना अर्थसशक्त समाज निर्माण व्हावेत यासाठी नव्या दिशा दाखवण्यासाठी सरकार असो की त्यांच्याबद्दल वरकरणी का होईना सहानुभूती बाळगणारे का पुढे येत नाहीत? आजही त्यांचे व्यवस्थाच शोषण करत असेल तर ती जबाबदारी सरकारांची व त्यांच्या विचारधारांची नाही काय?

आर्थिक प्रगती करण्यासाठी अनुकूल वातावरण व धोरण नसले की अर्थवंचितता येते आणि सामाजिक वंचिततेला खुले रान मिळते हे आपण समजावून घ्यायला हवे. हीच बाब भारतातील बव्हंशी समाजांना लागू आहे. शेतकऱ्यांना लागू आहे. आज जर मूळची सशक्त ग्रामीण संस्कृती लयाला जात आत्महत्यांची संस्कृती उदयाला येत असेल तर मग भारताने राबवलेल्या अर्थ-विचारधारांवरच संशय घेणे क्रमप्राप्त आहे. आम्ही कोठवर त्याच त्या नाडणाऱ्या, वंचिततेला सहाय्य करणाऱ्या विचारांना कवटाळून बसत एकाच डबक्यात कुंठत राहणार आहोत? आमची आजची व्यवस्था वंचितांचे वंचितत्व दूर करण्यासाठी नसून वंचितता जोपासण्यासाठी आहे हे आम्हीच नागरिक जोवर समजावून घेत नाही तोवर आमचे भवितव्य डबक्यातच राहणार. आमची सुख-दुःखे त्या मर्यादितच वर्तुळात फिरत राहणार कारण आम्हाला स्वातंत्र्याचे खुले अवकाश उपलब्धच नाही. ते आम्हालाच आमच्या विचारांच्या दिशा बदलत मिळवावे लागेल हे पक्के समजून असा!


'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# जन्मभूमीची महती सांगणारे पुस्तक ‘माझी स्मरणगाथा’

**रविवार दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथे ज्येष्ठ पत्रकार प्रकाश आरोटे यांनी लिहिलेल्या ‘माझी स्मरणगाथा’ या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ होत आहे. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक संदीप वाकचौरे यांनी यानिमित्त करून दिलेला या पुस्तकाचा विशेष परिचय. हे पुस्तक आपण ‘चपराक’च्या संकेतस्थळावरून घरपोच मागवू शकाल.**



**संदीप वाकचौरे**
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०




विवेकानंदाना परदेशात असताना तेथील लोक म्हणाले होते की, ‘‘तुम्ही पुन्हा त्या भारतात जाऊ नका. तुमच्यासारख्या विद्वान असलेल्या माणसांचे त्या देशात मूल्य नाही. तुम्ही आमच्या भूमीतच राहा. तुमच्या ज्ञानाची येथे कदर होईल.’’

तेव्हा विवेकानंद म्हणाले होते की, ‘‘माझी भूमी मला स्वर्गाहून प्रिय आहे. मला पुन्हा जन्म मिळणार असेल तर तो भारतमातेच्या उदरात घ्यायला आवडेल.’’

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात जन्मभूमीचे स्थान अनन्यसाधारण असतेच पण आपल्या मातीला असलेला इतिहास, तिचे सांस्कृतिक वैभव, त्या भूमीवर निसर्गाने केलेली कृपा आणि तेथील असलेल्या माणसांचे मोठेपण असं बरंच काही लाभलेले असते. जुना इतिहास आपल्याला काय देतो असे अनेक लोक विचारतात पण आपल्याला भविष्यकाळावर स्वार व्हायचे असेल तर इतिहास ज्ञात असावा लागतो मात्र काळाच्या ओघात अनेकदा इतिहासाचे वैभव लुप्त होत जाते आणि अत्यंत देदीप्यमान असलेला भूमीचे वैभव संपुष्टात आले तर पुन्हा जेव्हा केव्हा इतिहास लिहिला जाईल तेव्हा आपल्याला भविष्यकाळ माफ करणार नाही. त्यामुळे आपला इतिहास नव्या पिढीच्या हाती साहित्यकृतीच्या रूपाने दिला गेला तर त्या पिढीला आपल्या भूमीचे मोठेपण ह्रदयावर कोरण्यास निश्चित मदत होईल. शेवटी आपल्या भूमीचे आपल्या मनातील स्थान अधोरेखित करण्याचा प्रयत्न खरं तर सर्वदूर व्हायला हवा. त्यामुळे आपले गाव, तालुका आणि तेथील असणारी स्थळे म्हणजे काही माती, दगड नसतात तर तो एक पूर्वजांचा इतिहास असतो. जन्मभूमीतील अशा अनेक स्थळांचा अत्यंत माहितीपूर्ण आढावा घेत अकोलेचे पत्रकार प्रकाश आरोटे यांनी ‘माझी स्मरणगाथा’ हे पुस्तक नव्या पिढीच्या हाती दिले आहे. त्यातून आपला इतिहास पुन्हा जिवंत करण्याचा झालेला प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद म्हणायला हवा.

खरं तर अनेकदा शिक्षणाच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना राज्याचा, राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय इतिहास शिकवला जातो. त्यांना जगाची माहिती मिळते आणि विद्यार्थी ती माहिती सहजतेने सांगतात. मात्र त्यांना गावचा, तालुक्याचा, जिल्ह्याचा इतिहास सांगता येत नाही. अनेकदा शिक्षकांना सांगावा वाटत असला तरी त्यासाठीची साधने उपलब्ध असत नाहीत. अभ्यासक्रमाच्या तत्त्वानुसार गरजेप्रमाणे स्थानिक इतिहास शाळा शाळांमधून शिकवला जाण्याची गरज आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणातही तसे नमूद केले आहे. ती गरज लक्षात घेता या पुस्तकाचे निश्चित मोल असणार आहे. त्यामुळे अकोले तालुक्याचे असलेला ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास नव्या पिढीच्या हाती या पुस्तकाच्या निमित्ताने आलेला आहे.

अकोले तालुका विविधतेने नटलेला आहे. महाराष्ट्रात सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या मोजक्या ठिकाणांपैकी हा एक तालुका आहे. अहिल्यानगरची चेरापुंजी म्हणून ओळखला जाणारा हा तालुका आहे. तालुक्यात अनेक किल्ले आहेत. मोठमोठ्या ऐतिहासिक नोंदी असलेले किल्ले अनेकांना माहीत असतील पण येथे असलेल्या छोट्या छोट्या किल्ल्यांच्या, ऐतिहासिक वारशांच्या नोंदी या पुस्तकात वाचायला मिळतात. त्यामुळे नव्या पिढीली देखील आपल्या पूर्वजांची कर्तबगारी आणि भूमीचे मोठेपण अधोरेखित होण्यास मदत होणार आहे. अनेकांना कदाचित या तालुक्यातील किल्ल्यांची नावे  माहीत असतील पण त्याचा असलेल्या इतिहास ठाऊक असेलच असे नाही. आरोटेंनी तालुक्यातील सर्वच गड किल्ल्यांची माहिती या पुस्तकात नोंदवली आहे. गड-किल्ले म्हणजे केवळ दगडी बांधकाम नाही. ते किल्ले आपल्या इतिहासातील महापुरूषांच्या पराक्रमाची साक्ष देत असतात. किल्ले हे शौर्य, संघर्ष आणि स्वराज्याच्या इतिहासाचे प्रतीक आहेत. अकोले तालुक्यातील हरिश्चंद्रगड हा प्राचीन किल्ला केवळ स्थापत्यदृष्ट्या महत्त्वाचा आहे मात्र धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्याही त्याचे विशेष असे महत्त्व आहे. तालुक्यातील सह्याद्री पर्वतरांगेतील अनेक किल्ले स्थानिक इतिहासातील लढ्यांचे साक्षीदार आहेत. या किल्ल्यांचा अभ्यास म्हणजे शौर्यगाथेचा मागोवा ठरणार आहे. त्यामुळे या गडकिल्ल्यांची नोंदवलेली माहिती वाचकांना आनंद देणारी आहे. या नोंदींमुळे अकोल्याचे ऐतिहासिक स्थान आणि महत्त्व अधोरेखित होण्यास मदत झाली आहे. अकोले तालुक्यातील गडकिल्ले जसे महत्त्वाचे आहेत, त्याप्रमाणे अकोले तालुक्यात अनेक मंदिरे प्राचीन आहेत. त्या मंदिरांनी अनेकांना भुरळ घातली आहे. तालुक्यातील अमृतेश्वर मंदिर (रतनवाडी) हे स्थापत्यकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. हेमाडपंथी शैलीतील हे मंदिर आजही भक्तांना आकर्षित करते. याशिवाय इतर प्राचीन मंदिरे श्रद्धा आणि परंपरेची केंद्रे आहेत. या मंदिरांमधून स्थानिक समाजजीवन, धार्मिक श्रद्धा आणि कलात्मक परंपरा यांचा अभ्यास करता येणार आहे.

टाहाकारी येथील अंबिकामातेच्या मंदिरावरील कोरलेले शिल्प म्हणजे आपल्याला खजुराहो मंदिरावर कोरलेल्या शिल्पांची आठवण व्हावी इतकी सुंदर शिल्प येथेही पाहायला मिळतात. अकोलेतील गंगाधरेश्वराचे मंदिर, अगस्ती महाराजांचे मंदिर अशा अनेक मंदिरांचा इतिहास या तालुक्याच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक वैभवाची साक्ष देणारा आहे. या पुस्तकात तालुक्यातील विविध मंदिरांचा इतिहास, त्याचे महत्त्व आणि वर्तमानातील स्थिती याविषयी बरेच काही वाचकांना वाचायला मिळते. त्यामुळे तालुक्याच्या या इतिहासातील सौंदर्याच्या नोंदी समजून घेण्यास मदत होणार आहे. अकोले तालुक्यातील भंडारदरा धरणाला आता शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. उत्तर नगर जिल्ह्यासाठी हे सर्वात मोठे वरदान आहे. त्यादृष्टीने तालुक्यातील विविध धरणांची माहिती, त्यासंदर्भातील काही सूक्ष्म नोंदी देखील येथे वाचकांना सहजतेने वाचनास मिळतात.

अकोले तालुक्यात अनेक गुहा आणि शिलालेख आढळतात. हे अवशेष प्राचीन संस्कृतीचे पुरावे आहेत. त्या काळातील सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा मागोवा घेण्यास मदत करतात. शिलालेखांमधून तत्कालीन राजकीय घडामोडी आणि समाजरचना यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टिने अभ्यासकांना मदत झाली आहे. इतिहासाची साक्ष देणाऱ्या या गोष्टी असल्या तरी अलीकडच्या काळात देखील देशातील नामवंत संस्थांनी उत्खनन करून इतिहास शोधण्याच्या केलेल्या प्रयत्नांची नोंदही आरोटे यांनी घेतली आहे. त्यामुळे नवसंशोधन काय सांगते हेही वाचकांना वाचायला मिळते आहे. अकोलेतील लोककथा, गाणी, उत्सव आणि परंपरा या भूमीच्या आत्म्याला जिवंत ठेवतात. स्थानिक लोककथांमधून शौर्य, श्रद्धा आणि सामाजिक मूल्ये यांचा प्रत्यय येतो. या परंपरा अकोल्याच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहेत. ब्राह्मणवाडा येथील दगडूशेठ गणपतीचे भक्त आरोटे पुण्यात जातात आणि स्वतःच्या नावाचा इतिहास उभा करतात. तसेच तेथील सतीची समाधीसारख्या काही दुर्लक्षित गोष्टींना नव्याने उजाळा मिळत जातो. अकोले तालुक्यातील अनेक व्यक्तिंनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही तालुक्यातील अनेकांनी सहभाग दिला. काळाच्या ओघात मागे पडली आहेत मात्र त्यांनी स्वातंत्र्यासाठी योगदान दिले नसते तर आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असते का? त्या दृष्टिने तालुक्यातील योगदान देणाऱ्या अनेक दुर्लक्षित राहिलेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या लढ्याविषयीची माहिती देखील सहजतेने वाचायला मिळते. त्यामुळे तालुक्याचे स्वातंत्र्यसमरातील योगदान सहजतेने जाणून घेण्यास मदत होते. स्वातंत्र्याच्या लढाईत येथील ब्रिटीश मामलेदाराने केलेल्या अन्यायाच्या विरोधात जनतेने उठाव करून जिवंत जाळल्याचा इतिहास आहे. तो इतिहास आजही अकोल्यातील अनेक आंदोलनात सांगितला जातो. अशा घटना नव्या पिढीच्या समोर आणण्याचा हा प्रयत्न निश्चित कौतुकास्पद आहे. अकोले तालुका हा नेहमीच क्रांतिकारी तालुका म्हणून ओळखला जातो. त्या क्रांतिची बीजे अजूनही विविध अन्यायाच्या विरोधात उमटताना दिसतात. जिल्ह्याचा विचार केला तर जितकी आंदोलने अकोले तालुक्यातील विविध प्रश्नांवर होतात तेवढी जिल्ह्यात अपवादाने देखील होत नसतील. हा वारसा इतिहासाने दिला आहे हे पुस्तक वाचताना जाणवत राहते. आरोटे यांच्या या लेखन कार्यामुळे अकोल्याचा इतिहास केवळ प्राचीन वारशापुरता मर्यादित न राहता आधुनिक जडणघडणीतही महत्त्वाचा ठरणार आहे. त्या दृष्टिने पुस्तकातील नोंदी अधिक महत्त्वाच्या ठरतात.

अकोल्याच्या ऐतिहासिक स्थळांचा समग्र इतिहास नमूद करण्यात आला आहे. भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी असलेला इतिहास या पुस्तकात पानापानावर वाचायला मिळतो. पुस्तकात अनेक स्थळांची अभ्यासपूर्ण केलेली मांडणी म्हणजे केवळ भूतकाळाचा मागोवा नाही तर वर्तमान आणि भविष्य काळासाठीची प्रेरणा आहे. या पुस्तकाचा उद्देश अकोले तालुक्यातील ऐतिहासिक स्थळांची माहिती सुसंगत, संशोधनाधारित आणि आकर्षक भाषेत आणि सुयोग्य पद्धतीने वाचकांसमोर मांडण्यात आलेली आहे. प्रत्येक स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व, स्थापत्य वैशिष्ट्ये, सांस्कृतिक संदर्भ आणि स्थानिक परंपरा यांची ओळख या निमित्ताने वाचकांना होण्यास मदत होणार आहे. विद्यार्थी, शिक्षक, संशोधकांना तसेच इतिहासप्रेमींना स्थानिक इतिहास समजून घेण्यासाठी महत्त्वाचा स्त्रोत म्हणून या पुस्तकाची नोंद घेतली जाईल. पुस्तकात अकोले तालुक्यातील विविधअंगी घेतलेला आढावा अत्यंत सहज, सुलभ भाषेत घेतला आहे. पुस्तकात इतिहासातील स्थळांच्या नोंदी घेतलेल्या आहेत मात्र निवेदन करताना भाषिक सौंदर्य आणि लावण्य जाणवत राहते, त्यामुळे पुस्तक वाचताना कंटाळवाणे न होता वाचकांना आनंद मिळत जातो. माहिती देण्याचा प्रयत्न केला असताना कोठेही सनावळ्यांच्या जंजाळात लेखक गुंतलेला नाही. तालुक्यातील इतिहास सांगताना नव्या पिढीच्या मनात अभिमान निर्माण होण्याबरोबर, प्रत्येक गडकिल्ला, वाडे आणि अगदी मंदिरांकडे देखील पाहण्याची दृष्टी निर्माण करण्याच्या दृष्टिने या पुस्तकाचे मोल लक्षात घ्यायला हवे. तालुका आदिवासी, डोंगराळ असला तरी या भूमीत जन्माला आलेल्या प्रत्येकालाच त्याचा अभिमान वाटेल, नव्या पिढीलाही ही स्मरणगाथा निश्चित भावेल असा विश्वास आहे. तालुक्याची किमान ओळख करून देण्याचा केलेला प्रयत्न निश्चित कौतुकास्पद म्हणायला हवा. पुस्तकास ज्येष्ठ विचारवंत प्रा. एस. झेड. देशमुख यांची प्रस्तावना लाभली आहे तर प्रकाशक व ज्येष्ठ पत्रकार, ‘चपराक’चे संपादक घनश्याम पाटील यांनी पाठराखण केली आहे. अनुष्का वाकचौरे यांनी तालुक्याची जलदेवता म्हणजे भंडारदरा, क्रांतिची मशाल आणि मंदिर यांची नोंद घेत आकर्षक मुखपृष्ठ रेखाटले आहे. तालुका समग्रतेने समजून घेण्यासाठी हे पुस्तक वाचायलाच हवे. पुस्तक नेहमीप्रमाणे ‘चपराक प्रकाशन’ने दर्जेदार स्वरूपात, गुणवत्ता राखत वाचकांच्या हाती दिले आहे. हे पुस्तक जसे वाचनाचा आनंद देईल, त्याप्रमाणे वाचक प्रवासात, अथवा स्वकार्यात गुंतलेला असेल तर त्यांना श्रवणानंदाचा आनंद घेता येईल. त्यामुळे हे पुस्तक वाचने आणि ऐकणे असा दुहेरी आनंद वाचकांना, श्रोत्यांना देणार आहे. एका अर्थाने हे पुस्तक म्हणजे तालुक्याची गौरवगाथा आहे.

**माझी स्मरणगाथा**

**लेखक** – प्रकाश आरोटे, **प्रकाशक** – चपराक प्रकाशन, पुणे

**पाने** – १५२, **मूल्य** – ३००.

# खड्ड्याच्या मागेही खड्डा अन् खड्ड्याच्या पुढेही खड्डा..!



जनार्दन देवरे
मनमाड
९०११६९४८८५



## मसाला पान

(या लघुनाट्यांशातील सर्व पात्रे व घटना काल्पनिक असून ती कुणाच्या व्यक्तिमत्त्वाशी वा घटनांशी जुळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा. – लेखक )

(सकाळी सकाळी महाराज विविध वर्तमानपत्रे वाचत बाल्कनीत आरामखुर्चीत बसले आहेत, तेवढ्यात सेवक व प्रधानजी एका आम माणसाला धरून महाराजांपुढे आणतात.)

**सेवक/प्रधानजी :** जय हो! विजय हो! महाराजांचा विजय असो!

**महाराज :** हं बोला प्रधानजी! आणि हे काय? कुणाला पकडून आणलंय हे सकाळी, सकाळी..!

**सेवक :** महाराज, हा आहे आपल्या प्रांतातील आम आदमी रस्त्याने राजीनामा! राजीनामा! असे ओरडत चालला होता! विचारल तर म्हणतो कसा? आज आनंदाचा दिवस! एक-एक विकेट अशीच जाणार!

**प्रधानजी :** पुढे विचारलं तर म्हणतो की, खड्डे सम्राटांचा अंत जवळ आलाय! न्यायाचाच विजय होईल! आणि एक गाणं का कविता काय म्हणतात तेही गात होता महाराज! सेवका कोणतं गाणं होतं रे ते?

**सेवक** (उत्साहाने) :

**खड्ड्याच्या मागेही खड्डा**
**अन् खड्ड्याच्या पुढेही खड्डा**
**खड्ड्यांनी गिळले रस्त्याला**
**अपेक्षांना पडला मोठ्ठा खड्डा!**

**महाराज :** म्हणजे काय? का रे बाबा कशाबद्दल एवढा आनंद व्यक्त करीत फिरतोयेस नगरात?

(आम आदमी जोरात हसतो बोलत मात्र काही नाही.)

**प्रधानजी :** अरे बोल ना! बाहेर तर वाट्टेल ते बोलत होतास आणि आता काय वाचा बसलीय होय!

(प्रधानजी, महाराजांच्या जवळ जात त्यांच्या कानात काहीतरी कुजबुजतात, महाराज दचकून उभे राहतात.)

**महाराज :** काय? दिल्लीकरांची टिंगल उडवीत होतास? शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याचं सेलिब्रेशन साजरं करीत होतास? अरे वेड्या, दिल्लीकर जाऊ दे आपल्या शहरातल्या त्यांच्या एखाद्या गुप्तहेरास ही गोष्ट कळली तर फार भयंकर परिणाम होतील; याची जाणीव आहे की नाही तुला? अरे बाबा, अशाने सगळी ग्रॅण्ड बंद व्हायची आपल्या संस्थानाची! आधीच आपला जीडीपी जागचा हलेना.

(आम आदमी मात्र शांतपणे हसतोय.)

**सेवक :** अरे हसतोस काय आणखी वरून, बोल ना आता बोल! नौटंकी म्हणतोस होय राज्यकारभाराला...! जिथे खातो तिथेच ओकतो. अरे सत्ताधाऱ्यांबद्दल आदर नाही तर नाही, वरून आनंद साजरा करतोस?

(अचानक राणीसाहेब प्रवेशतात.)




**राणीसाहेब :** अहो, कसा राहील आदर! सगळं खाऊन झाल्यावर जगाला जेवायला बोलावता होय! लोक काय वेडे वाटतात का तुम्हाला या देशातले?

(आता मात्र आम आदमी हसत हसत मोठ्याने ओरडू लागतो.)

**आम आदमी :** भरला, भरला, पापाचा घडा भरला, शंभर पापे पूर्ण झालीत की... खेळ खल्लास! सत्तेतून आलेली मुजोरी संपणार! नेत्यांची बोलबच्चनगिरी आणि खड्डेगिरी संपणार! जिंदाबाद! जिंदाबाद! आम आदमी जिंदाबाद! कमिशनखोरी मुर्दाबाद!

(महाराज वरमतात.)

**महाराज :** जाऊ द्या रे याला, हा मनोरुग्ण दिसतोय! उचला याला अन् जाऊ द्या गावाबाहेर, आणखी कुठे बोंबा मारायच्या आत याचा बंदोबस्त करा! उचला लवकर.

(चार सैनिक मिळून आम आदमीला उचलतात)

**राणीसाहेब :** काय बंदोबस्त करताय त्याचा! महागाईने आधीच त्याला अर्धमेला करून टाकलाय, रस्त्यावरच्या खड्ड्यांनी त्याची पार हाडं खिळखिळी झालीत, भ्रष्टाचाराने त्याचा कणाच मोडून टाकलाय म्हणे बंदोबस्त करा! दिल्लीकरांचं एवढं लांगूलचालन बरं नव्हे!

**महाराज :** राणीसाहेब! गप्प बसा क्षणभर! यातलं काय कळतंय तुम्हाला? जाऊ द्या रे उचला त्याला...! एखाद्या वेड्यांच्या दवाखान्यात ॲडमिट करा याला! जा घेऊन!

(सैनिक आम आदमीला उचलून बाहेर नेतात. आम आदमी फक्त मुठी आवळून संताप व्यक्त करतोय, बोलत मात्र काहीच नाही.)

**राणीसाहेब :** हे योग्य नाही महाराज, सामान्य माणसाचा आवाज किती दिवस दाबणार तुम्ही! अन्यायाची परिसिमा झाली की क्रांती होतेच, हा सिद्धांतही विसरलात तुम्ही.

(सेवक आणि प्रधानजींकडे पाहत महाराज म्हणतात.)

**महाराज :** जा प्रधानजी जा तुम्हीही! सेवका जा तू ही जा आता; आम्हाला राणीसाहेबांशी काही खासगीत बोलायचंय, या तुम्ही!

(दोघेही नाराज होत बाहेर जातात.)

**राणीसाहेब :** अहो, आता खाजगीत बोलायला काय उरलंय? सगळं जगजाहीर झालंय! कुणाकुणाला मनोरुग्ण ठरवणार नेत्यांचे चमचे आणि चमच्यांचे चेले! गावोगावी हेच चाललंय.

**महाराज :** राणीसाहेब हळू बोला! अहो या मागे काही राजकीय कारणं असतात. काही गणित असतात.

**राणीसाहेब :** कसली कारणं? मोठ्या मंडळीला अडचणीत आणून आपली कमिशन खोरीयुक्त दादागिरी चालवायची. काय अर्थ आहे याला? सारं कळतंय जनतेला आता! आधी आपखूशीने राजीनामा द्यायचा आणि मग चौकश्या, एफआयआरचा मारा. साऱ्या राज्यात खड्डेच खड्डे! एका शहरात तर खड्ड्यातल्या पाण्यात मासे! व्वा! त्या नाशकात तर काय कुंभमेळा आहे म्हणून सारं शहरच खणून ठेवलंय! हे असं असतं का प्रशासन? म्हणे संकटमोचकाहाती नाशिक? खड्डेग्रस्त झालंय अख्ख शहर. काल तर तिकडे खड्डे कवीसंमेलन झालं म्हणे? सारा गोंधळच गोंधळ! आणि....

**महाराज :** आणि काय आणखी? हळू बोला, अहो भिंतीलाही कान असतात...! आणि कवींना काय संधीच हवी! दिसला खड्डा की फेकली कविता.

**राणीसाहेब :** असतात ना भिंतीलाही कान; मग राज्यातल्या जनतेला काय कान नसतात होय? कवी तर सकल विश्वाचे मुक्त पाखरू! आणि एक सांगू का, यामुळे होतं काय की, भ्रष्टाचाराचा मूळ मुद्दाच बाजूला पडतो... कर भरणाऱ्या जनतेच्या खिशातले दहा-वीस हजार कोटी लंपास करायचे; आपापल्या पित्त्यांना कत्राटं द्यायची, वीस-वीस टक्के कमिशन ओरबाडून विकासकामांचा बोजवारा उडवायचा, मग पुन्हा नवी कामं आणि पुन्हा पैसे ढापायचे,त्यातून पुन्हा मतं विकत घ्यायची. अहो चाललाय काय?

**महाराज :** राणीसरकार अहो चिडू नका.एवढा मोठा विकास साधायचा तर ही लहानमोठी टीप द्यावी/ घ्यावी लागणारच.

**राणीसाहेब :** यामुळेच तर, सारी महानगरपालिका क्षेत्रे बरबटली होतीच कमिशनच्या गटारीत आता नगरपालिकाही या कंत्राटांच्या गटारात मुक्त संचार करू लागल्यात. प्रत्येक नगरसेवक कसला ना कसला ठेकेदार आहेच. खेड्यापाड्यातल्या ग्रामपंचायतीही पार लयास चालल्यात या भकासीकरण उद्योगात.

**महाराज :** अहो आपलं स्वप्न आता महासत्तेचं आहे. तेव्हा...

**राणीसरकार :** वाह रे महासत्ता! वाटा मुरमुऱ्याचा भत्ता! सारं आकलनापलीकडचं आहे महाराज, भ्रष्टाचाराच्या

> **वेलची**
>
> **देशातील प्रत्येक माणसाला ज्या दिवशी स्वत:मधील असलेल्या भ्रष्ट वृत्तीची जाणीव होईल, त्या दिवशी हा देश खरंच जगज्जेता असेल.**

विषयांवरून लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी आहेतच नेत्यांचे मानापमानाचे, थोरपणाचे डेली लाईव्ह एपिसोड, तोंड आहे म्हणून काहीतरी बकायचं, वाद वाढवायचे आणि टिव्हीवरच्या पुचाट बाष्कळ चर्चात रंग उधळायचे! एक एक मंत्री शेकडो कोटींचा धनी, खासदार, आमदार पन्नासेक कोटींच्या खाली नाहीत, नगरसेवक किमान दहा कोटीत खेळणार आणि वरून शहाजोगपणे चौकशी करा म्हणायचे!

**महाराज :** राणीसाहेब, पटतंय आम्हाला तुमचं म्हणणं पण सत्तेपुढे शहाणपण नाही चालत...

**राणीसाहेब :** म्हणून तर हे वेडे उद्यास येतात आणि नाकी नऊ आणतात. शेवटी माफीनामा द्यायचा अन् नवा दिवस नवा वाद उकरायचा!

**महाराज :** अहो पण यामागची भूमिका नको का आपण समजून घ्यायला?

**राणीसाहेब :** सत्तेतून पैसा अन् पैशातून सत्ता हे गणित चांगलं जमतं हो तुमच्या राजकारण्यांना! बरे हीच लागण आता गावोगावी झालीय, सारे सत्तेतून दादागिरी गाजवू पाहतात, अधिकाऱ्यांना भिववितात, कर्मचाऱ्यांना छळतात. कार्यकर्त्यांच्या भाडोत्री फौजा दिल्लीतही तैनात ठेवतात. हे राज्य म्हणजे ठेकेदारांच्या जाळ्यात अडकलेले राज्य झालंय. प्रत्येकाला हवे कमिशन आणि सत्तेची गुर्मी! थांबवा हे, थांबवा हे आताच, नाही तर फार उशीर होईल! हा विकास नाही खड्डे-सम्राटांचा जनतेस त्रास आहे. लोकशाहीचा डोळ्यांदेखत चाललेला ऱ्हास आहे! थांबवा हे सारं...!

**महाराज :** पण यासाठी आपण तरी काय करणार? आपले हात बांधलेले. जनतेने नको का काही करायला? जनतेलाही सारं मोफत हवं, धान्य द्या, प्रवासात सवलत द्या, भाऊबीज द्या, सवलती द्या, आरक्षणासाठी उत्पन्न मर्यादा वाढवा, मोफत दप्तर द्या, खिचडी द्या, वीजबीलात सूट द्या. असे एक ना अनेक मोफत वाटू-उद्योग केल्याशिवाय लोक मत नाही देत अलीकडे. शिवाय निवडणुकीच्या वेळी कोरडा / ओला शिधा मतदारांना हवाच! लोकांच्या आतल्या या भ्रष्ट वृत्तीचं काय करणार? सर्वांनाच शार्टकट्स हवेत.

**राणीसरकार :** मी तर म्हणते आता हे फुटकचे फुटाणे वाटप बंद करून फालतू कुटाणे टाळा..! फक्त आरोग्य आणि बालवाडी ते पदवीपर्यंत महाविद्यालयीन शिक्षण सर्वांना द्या! टोल फ्री चांगले रस्ते द्या. म्हणजे मिळवले. शेतीमालाला सरकारला शोभतील असे भाव द्या! बस्स! येते मी!

**महाराज :** अहो पण, थांबा की जरा! हे मसाला पान तर घ्या!

**राणीसाहेब :-** तुम्हीच बसा चघळत तुमचं मसाला पान! येते मी...!


(राणीसाहेब तणफणत पदर खांद्यावर घेत निघून जाताच पडदा पडतो.)



अनिल दातीर
सातारा, ९४२०४८७४१०

व्हिएतनाम : भाग तीन

# खाली दुकान, वर मकान!




हॉटेल सोडून आम्ही एअरपोर्ट वेळेत गाठलं पण सेक्युरिटी चेक झाल्यावर फु-कॉकला जाणारी फ्लाईट लेट आहे असं कळलं. एअरपोर्टवर स्थानिकांची गर्दी होती. लुनार फेस्टिवलच्या सुट्ट्या असल्याने बरीचशी मंडळी फॅमिलीसह आपापल्या गावी किंवा पर्यटनस्थळी निघाली होती. बहुतांशी लोकांकडे लहान मुलं होती, ती फारच गोंडस दिसत होती. कदाचित वय वाढतं तसा चेहरा बदलतो पण नाक मात्र लहानच राहत असावं! पण ही लहान मुलं मात्र नाकी-डोळी नीटस दिसत होती. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे १५ वर्षापेक्षा जास्त वयाची मुलं-मुली क्वचितच दिसली. कदाचित या वयात आईवडिलांबरोबर फिरायला जाण्याची प्रथा नसावी तिथे.

एअरपोर्टवर भरपूर गर्दी असल्याने अनेक जण निवांत खाली मांड्या घालून बसले होते. आमच्या शेजारी एक पोलंडचा व्यक्ती बाकड्यावर अडवातिडवा झोपला होता. फुल्ल टाइट होता. राजेशने त्याला जागे करायचा प्रयत्न करत मदत केली. त्याचे अस्ताव्यस्त पडलेले सामान उचलून त्याला दिले. तेवढ्यात कोणीतरी सांगितले की आपल्या विमानाचा बोर्डिंग गेट बदलला आहे. सगळे जण घाई गडबडीत उठले. राजेशने जबाबदारी म्हणून त्या गोऱ्यालाही हात धरून उठवले. मीही उठलो आणि चेअरवर ठेवलेला मोबाईल तिथेच विसरलो. नशीब निलेशचे लक्ष पाठीमागे गेले आणि त्याला मोबाईल दिसला. मैत्रीला जागत त्याने तो लगेच लपवून ठेवला. थोडे पुढे जाताच गेट बदलले नसल्याचे कळले आणि आम्ही परत फिरलो. मला अचानक मोबाईल आठवला आणि तो सापडेना. चर्चेच्या काही फेऱ्यानंतर बियर पाजायच्या बदल्यात मोबाईल परत मिळाला. (जस्ट फॉर फन) तो फॉरेनर आता चांगला शुद्धीत आला होता आणि गप्पा मारू लागला होता. नंतर परत त्याने पेग मारलाच. मग मात्र त्याला सर्वांनी दूर ठेवलं.

१२.५० च्या फ्लाईटचं बोर्डिंग दोनला सुरु झालं पण प्रत्यक्षात टेकऑफ झाला तेव्हा ३ वाजले होते. फ्लाईट एक तासाची होती. आमचे दुपारचे जेवण फु-कॉक आयलँड्सलाच होणार होते. एअरपोर्टवर उतरलो तेव्हा आजूबाजूला प्रचंड मोठ्या प्रमाणात एअरपोर्टचे विस्तारीकरण चालू आहे. मुळात हे फु-कॉक आयलँड्स टुरिझमसाठीच डेव्हलप केलेले आहेत. याठिकाणी २०२७ साली एक आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषद होणार आहे, त्यासाठी आणि नंतर पर्यटनासाठी या विमानतळाचा विस्तार केला जातोय. आम्ही हॉटेल इंडिया गेटला जेवणासाठी पोहोचलो. यांच्या व्हिएतनाममध्ये आठ ब्रँचेस आहेत. नंतरही जे इंडियन हॉटेल्स भेटले त्यांच्या सुद्धा अनेक ब्रँचेस होत्या. जेवण करून आम्ही हॉटेलकडे निघालो. ते बरेच दूर होते. पोहोचेपर्यंत अंधार झाला होता. या VIN FIESTA HOLIDAY ला आत जाताच त्याच्या भव्य लॉबीने एकदम खूश झालो. हॉटेल खूपच भव्य होते. साडेतीनशे रूम्स असलेल्या या हॉटेलमध्ये आम्हाला आठच रूम मिळाल्या होत्या. दोघांना दुसऱ्या हॉटेलमध्ये राहावे लागले. सर्व हॉटेल फुल्ल होते. आम्ही रूम ताब्यात घेऊन, आवरून बाहेर पडलो. बसने आम्हाला जवळच्याच एका स्पॉटवर सोडले. ते होते ग्रँड वर्ल्ड. फक्त बांबूचा वापर करून शंभर फूट उंच असं अवाढव्य स्ट्रक्चर उभे केलेले होते. त्याचा आतला डोम प्रचंड मोठा होता आणि या इमारतीचा वापर फक्त टुरिस्ट ऍट्रॅक्शन एवढाच होता. बाहेरच्या गार्डनमध्येही अनेक स्टॅच्यू उभे केलेले होते. हे सर्व बीचला लागून होते. रस्ता ओलांडला की पुढे समुद्र होता. नंतर आम्ही बसने अजून थोडे अंतर गेलो आणि एका मोठ्या चौकात पोहोचलो. इथेच आमचे अजून एक इंडियन रेस्टॉरंट होते. समोर मोठा ऐसपैस रस्ता, त्याच्या पलीकडे मोठा तलाव. त्यात म्युझिकल लायटिंग. सर्व रस्त्यांना वेगवेगळी सजलेली दुकाने. रस्त्यावरून घोडागाडी किंवा इलेक्ट्रिक टमटम, लहान मुलांसाठी रोबोट कार असे विविध प्रकार उपलब्ध होते. हॉटेलवाल्यांनी बाहेर टेबल टाकलेले होते आणि डीजे लावलेला होता. आमची ग्रुप व्यवस्था आतल्या हॉलमध्ये केलेली होती पण तो माहोल बघून आम्ही सर्व जण वेटरची किरकिर न जुमानता बाहेर ओपन लॉनमध्ये बसलो. जब मिल बैठेंगे चार यार, तो एंटरटेनमेंट अपरंपार! मस्त माहोल तयार झाला होता. बरेचसे ग्राहक इंडियन होते, काही फॉरेनरही होते. डीजेवाल्याने आमच्यासाठी हिंदी-पंजाबी गाणी लावली होती. थोड्या वेळाने त्या डीजेवाल्याचा आम्हीच ताबा घेतला आणि आम्हाला हवी तशी गाणी वाजू लागली. आम्ही सर्वांनीच त्या ठेक्यावर ताल धरत नृत्याविष्कार (?) सुरू केले. रस्त्याने जाणारी येणारीही आमचे फोटो काढत होती. एक फॉरेनर तर आमच्यातच घुसला अन् मुक्त नाचू लागला. त्याची बायको कौतुकाने त्याचे आणि आमचे फोटो काढत होती. काही वेळाने काही इंडियन सुद्धा आमच्यासोबत नाचू लागले. अनेक लावण्या, मराठी गाणी आणि प्रथेप्रमाणे शेवट झिंगाटनेच झाला. काही वेळाने समोरच्या तलावात कारंजे उडू लागले. त्यावर लाईट आणि म्युझिकचा एक दहा मिनिटाचा शो झाला. फु-कॉक आयलँड २४ तास चालू असते असे म्हणतात. जेवण करून आम्ही रोडवर आलो आणि एकाने इलेक्ट्रिक टमटम थांबवली. तिच्यात दहा जण आणि अजून दुसरीत आठ जण बसलो. नुसताच एक चक्कर मारून आण असे त्याला सांगितले पण त्याला काय वाटले कोणास ठाऊक! त्याने आम्हाला खूप दूरपर्यंत नेले. रस्त्याने त्या गाड्यांमधून जाताना आमचा आरडाओरडा चालू होता. शाळकरी मुलं असल्यासारखी सर्व जण एकमेकाला चिडवत एन्जॉय करत होते. ऐसपैस रस्ता. दोन्ही बाजूला तीन मजली एकसारख्या डिझानच्या इमारती. अल्टरनेट कलर फक्त वेगळा. खाली दुकान आणि वर राहण्याची सोय! पण सगळे बंद. त्या इमारतींमधून कोणी राहत असल्याची काहीही चिन्ह दिसत नव्हती. एकाही खोलीत लाईट लागल्याचे दिसत नव्हते. त्यावेळी आश्चर्य वाटले पण नंतरही अनेक ठिकाणी अशा भरपूर इमारती दिसल्या. हे होते फ्युचर प्लॅनिंग. सर्व इन्फ्रास्ट्रक्चर पुढच्या पन्नास वर्षाचा विचार करून आत्ताच उभारून ठेवले आहे. बाहेरच्या लोकांनी इथे यायचं, खाली दुकान, वर मकान विकत घ्यायचं आणि टुरिस्टच्या जीवावर आरामात जगायचं. या टमटममधून चांगली अर्ध्या-पाऊण तासाची सफर करून आम्ही सर्व जण आपापल्या हॉटेलवर परतलो. उद्या फु-कॉक आयलँडच्या सन वर्ल्डला जायचे आहे. तो प्रवास पुढील भागात.

# जे. डी. पराडकर यांच्या 'ऋतुरंग'ला राज्यस्तरीय अक्षर गौरव साहित्य पुरस्कार

## 'चपराक प्रकाशन'ची निर्मिती; अश्वमेध ग्रंथालय व वाचनालयाचा उपक्रम




**पुणे** : 'बुके ऐवजी बुक' या संकल्पनेतून 'चपराक प्रकाशन'ने कोकणातील लेखक जे. डी. पराडकर यांच्या प्रकाशित केलेल्या 'ऋतुरंग' या पुस्तकाला सातारा येथील अश्वमेध ग्रंथालय आणि वाचनालयाचा कै. भास्करराव ग. माने स्मृत्यर्थ 'राज्यस्तरीय अक्षर गौरव साहित्य विशेष पुरस्कार २०२५' प्राप्त झाला आहे. पुरस्कारासाठी साहित्याची निवड झाल्याचे पत्र त्यांना प्राप्त झाले.

'ऋतुरंग' या पुस्तकाला प्रस्तावना निसर्ग अभ्यासक डॉ. उमेश मुंडल्ये यांनी लिहिली आहे तर पाठराखण तत्कालीन कारागृह उप महानिरीक्षक स्वाती साठे यांनी केली आहे. ऋतुरंग या पुस्तकाचे प्रकाशन दिल्ली येथे संपन्न झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांच्या हस्ते झाले होते. 'कोणत्याही कार्यक्रमात बुके देण्याऐवजी ऋतुरंगसारखे कोकणातील फुलांची माहिती असलेले बुक द्यावे,' अशी संकल्पना 'चपराक प्रकाशन'चे संपादक घनश्याम पाटील यांनी मांडली होती. ऋतुरंग या पुस्तकाचे मुखपृष्ठ जलरंग चित्रकार विष्णू परीट यांनी साकारले आहे.

हे पुस्तक संपूर्ण रंगीत पानांचे असून यामध्ये कोकणातील फुलांची छायाचित्रे आणि माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. अश्वमेध ग्रंथालय व वाचनालय साताराचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र माने, संस्थापक रवींद्र भारती यांनी ऋतुरंग या पुस्तकाला राज्यस्तरीय अक्षर गौरव साहित्य विशेष पुरस्कार २०२५ प्राप्त झाल्याबद्दल लेखक जे. डी. पराडकर आणि 'चपराक'चे संपादक, प्रकाशक घनश्याम पाटील यांचे अभिनंदन केले आहे. सदर पुरस्कार वितरण समारंभ २३ ऑगस्ट २०२६ रोजी सोमण सभागृह सातारा येथे सकाळी ११ वा. संपन्न होणार आहे.




# पर्यावरणाचा ऱ्हास



**मयूर बागुल**
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

**लघुकथा**

धरणीपूर नावाचं एक छोटंसं गाव होतं. हिरव्यागार डोंगरांच्या कुशीत वसलेलं, झुळझुळ वाहणाऱ्या नदीच्या काठावर विसावलेलं. सकाळी कोंबड्यांच्या आरवण्याबरोबर गाव जागं व्हायचं आणि संध्याकाळी गुरं परतल्यावर मावळत्या सूर्याच्या साक्षीनं शांत झोप घ्यायचं. हवा इतकी स्वच्छ होती की श्वास घेताना जणू फुलांचा सुगंध आत जातोय असं वाटायचं.

गावात गणू नावाचा एक वृद्ध शेतकरी राहत होता. त्याच्या आठवणीतलं धरणीपूर म्हणजे एक जिवंत स्वर्ग होतं. ही जमीन आपली आई आहे, तो नेहमी म्हणायचा. ती आपल्याला पोटभर अन्न देते, सावली देते, पाणी देते. त्याचा नातू चिंटू मात्र वेगळ्या काळात वाढत होता. त्याला मोबाईल, मोटारसायकल आणि शहरातल्या मोठ्या इमारतींचं आकर्षण होतं. एक दिवस गावात काही परदेशी कपड्यांतील लोक आले. त्यांनी ग्रामसभेत एक प्रस्ताव मांडला, 'गावाजवळ मोठा कारखाना उभारायचा. रोजगार मिळेल, पैसा येईल, गाव प्रगत होईल,' असं त्यांनी सांगितलं. तरुणांना हे स्वप्नासारखं वाटलं. चिंटूही त्यांच्याच बाजूने उभा राहिला. गणू मात्र शांतपणे ऐकत होता. त्याच्या डोळ्यांत काळजी होती.

''कारखाना आला तर नदीचं काय?'' त्याने विचारलं. ''अहो काका, आता काळ बदलला आहे,'' एक तरुण म्हणाला. प्रगतीसाठी थोडंफार बदल सहन करावं लागतं. ग्रामसभा संपली आणि काही महिन्यांतच डोंगराच्या पायथ्याशी मोठ्या यंत्रांची गर्जना सुरू झाली. झाडं तोडली गेली, माती उपसली गेली आणि धरणीपूरच्या शांततेवर लोखंडी आवाजांचं राज्य आलं. सुरुवातीला सगळं छान वाटत होतं. गावात रोजगार आला, लोकांच्या हातात पैसा आला. चिंटूला कारखान्यात नोकरी मिळाली. त्याने नवीन मोटारसायकल घेतली. घरात टीव्ही, फ्रीज आले! पण हळूहळू काही बदल दिसू लागले. नदीचं पाणी पूर्वीसारखं स्वच्छ राहिलं नाही. त्यात एक विचित्र वास येऊ लागला. मासे कमी झाले. शेतात पिकं आधीसारखी बहरत नव्हती.

''ही जमीन थकली आहे,'' गणू म्हणाला पण कोणी त्याचं ऐकलं नाही. काही महिन्यांनी गावातल्या मुलांना खोकला आणि त्वचेच्या समस्या होऊ लागल्या. डॉक्टरांनी सांगितलं की हवेत प्रदूषण वाढलं आहे. एक दिवस चिंटू कामावरून घरी येताना नदीकाठी थांबला. त्याने पाहिलं की नदीच्या काठावर फेस साचला होता. पाणी काळपट दिसत होतं. त्याला आठवलं लहानपणी तो याच नदीत पोहत असे. त्याने कारखान्यातल्या वरिष्ठांना विचारलं, ''हे पाणी असं का झालं आहे?'' उत्तर आलं, ''हे विकासाचे दुष्परिणाम आहेत. काळजी करू नकोस!''

पण काळजी करण्यासारखं खूप काही होतं. पुढच्या वर्षी पावसाळा आला पण पाऊस अनियमित झाला. कधी प्रचंड पाऊस, कधी दीर्घ कोरडे दिवस. शेतं उद्ध्वस्त झाली. नदीला पूर आला आणि गावात पाणी शिरलं. गणूच्या शेतातलं पीक वाहून गेलं. तो चिंटूकडे पाहून म्हणाला, ''प्रगती म्हणजे निसर्गाचा नाश नाही रे!''.

चिंटूला आता अपराधी वाटू लागलं. त्याने पाहिलं की कारखान्याच्या धुराड्यातून काळा धूर निघत होता, जो हळूहळू आकाश झाकत होता. गावात आजार वाढले. लोकांना श्वास घेणं कठीण होऊ लागलं. एके दिवशी चिंटूने गणूला विचारलं, ''आपण काय करू शकतो?''

गणू म्हणाला, ''निसर्गाला जपलं नाही तर तो आपल्याला सोडून जातो.''

त्या रात्री चिंटू झोपू शकला नाही. त्याला आठवलं झाडांच्या सावलीत खेळलेले दिवस, नदीत पोहलेले क्षण, शेतातल्या वाऱ्याची थंड झुळूक. दुसऱ्या दिवशी त्याने गावातल्या तरुणांना एकत्र केलं. आपणच बदल घडवूया, तो म्हणाला. त्यांनी कारखान्याच्या व्यवस्थापनाशी चर्चा केली. प्रदूषण नियंत्रणाची मागणी केली. नदी स्वच्छ करण्यासाठी मोहीम सुरू केली. झाडं लावली. सुरुवातीला विरोध झाला पण हळूहळू लोकांना जाणीव झाली. गणूने पहिलं झाड लावलं. ही आशेची बी आहे, तो म्हणाला. काही वर्षांनी बदल दिसू लागला. नदी पुन्हा स्वच्छ होऊ लागली. हवा थोडी हलकी वाटू लागली. धरणीपूरने एक मोठा धडा शिकला होता प्रगती आणि पर्यावरण यांचा समतोल राखणं आवश्यक आहे. गणू आता खूप वृद्ध झाला होता. एक दिवस तो नदीकाठी बसला होता. चिंटू त्याच्या शेजारी आला. ''आज हवा पुन्हा सुगंधी वाटते,'' चिंटू म्हणाला. गणू हसला; ''कारण तुम्ही निसर्गाशी पुन्हा मैत्री केली आहे.''

सूर्य मावळत होता. नदी शांतपणे वाहत होती आणि धरणीपूरने पुन्हा श्वास घ्यायला सुरुवात केली होती. ■■



**भरत विठ्ठल पाटील**
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

**मज आवडते मनापासूनी शाळा**

# तुमचं पुस्तक

शाळा भरली. शाळेत आज मराठीचा राहिलेला आभाळातील फरकांड्या धडा शिकवायचा होता. धड्याची तयारी करण्यासाठी पुस्तक हातात असावे म्हणून मी दुर्वाकडे पुस्तक मागितले. रोजच्याप्रमाणे ती आपले पुस्तक पुढे करेल, अशी मला अपेक्षा होती; पण ती सहजपणे म्हणाली, ''सर, तुम्हाला नाही देती का पुस्तक? दरोज माझंच पुस्तक घेता. मला पण लागतं ना पुस्तक... तुम्ही सांगितलेलं लिहायला, खुणा करायला.''


क्षणभर मी स्तब्ध झालो. पहिल्या बेंचवर बसणारी दुर्वा हसत होती. तिच्या चेहऱ्यावर राग नव्हता, तक्रार नव्हती; पण तिचा प्रश्न एक मोठा होता. ती तिच्या जागी अगदी बरोबर होती. तिच्या अभ्यासासाठी मिळालेले पुस्तक तिला जपावे लागणारच होते. त्यावर खुणा करणे, अवघड शब्द लिहिणे, धड्याचा अभ्यास करणे हा तिचा अधिकार होता पण मग मी कुठे आहे हे कळण्यास वेगळा अनुभव घ्यायची गरजच नव्हती. हे असे होणार कधी तरी हे जाणवत होतेच आणि ते आज समोर होते.

शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना पुस्तके मिळतात, ही अत्यंत चांगली आणि स्वागतार्ह बाब आहे. शिक्षणाचा अधिकार प्रत्येक मुलापर्यंत पोहोचावा यासाठी ही योजना महत्त्वाची आहे पण या व्यवस्थेत एक प्रश्न मात्र कायम दुर्लक्षित राहतो तो म्हणजे विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकाच्या हातात अध्यापनासाठी आवश्यक साधने कोण देणार? गेल्या काही वर्षांपासून इयत्तेचा एक सेट शिक्षकासाठी हा विसरच पडलेला आहे.

शिक्षकाला नेहमीच गृहीत धरले जाते. 'शिक्षक आहे म्हणजे तो सर्व काही करेल' अशी एक मानसिकता तयार झाली आहे. शिक्षकाकडे पुस्तक असेलच, नियोजन असेलच, साधने तो स्वतःच तयार करेल, अतिरिक्त खर्च तो स्वतःच करेल अशा अपेक्षा सहज केल्या जातात; पण वर्ग पातळीवर येणाऱ्या समस्या लक्षात कोण घेते? शिक्षकही माणूस आहे. त्यालाही अध्यापनासाठी योग्य साधने, वेळ आणि सुविधा आवश्यक आहेत. हे लक्षात घेणं आवश्यक आहे. विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचा संच दिला जातो पण त्याच पुस्तकांचा एक अतिरिक्त संच शाळेतील शिक्षकांसाठी दिला तर काय बिघडेल? उलट त्याचा फायदा विद्यार्थ्यांनाच होईल. शिक्षकाला धडा आधी वाचता येईल, महत्त्वाचे मुद्दे अधोरेखित करता येतील, प्रश्न तयार करता येतील, कृतिंचे नियोजन करता येईल, शैक्षणिक साहित्य तयार करता येईल आणि अध्यापन अधिक प्रभावी होईल. ज्या हातात ज्ञान देण्याची जबाबदारी आहे, त्या हातात पुस्तकच नसेल तर अपेक्षित गुणवत्तेचे शिक्षण कसे घडेल?

आज शिक्षकांकडून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा केली जाते. नव्या शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी दिली जाते. विविध उपक्रम, नोंदी, अहवाल, प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर याची अपेक्षा केली जाते पण त्याच वेळी शिक्षकाला मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करावा लागतो, ही वास्तवातील विसंगती आहे. शिक्षकाच्या हातात पुस्तक नसताना त्याच्याकडून उत्तम अध्यापनाची अपेक्षा करणे म्हणजे शेतकऱ्याला बियाणे न देता भरघोस पीक मागण्यासारखे आहे. मुलांना मिळणाऱ्या सुविधांइतक्याच शिक्षकांच्या गरजांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे कारण शिक्षक सक्षम असेल तरच विद्यार्थी सक्षम होतील. पाठ्यपुस्तक हे शिक्षण प्रक्रियेचे मूलभूत आणि सर्वात विश्वासार्ह साधन आहे. विद्यार्थ्यांसाठी ते ज्ञानाचा मार्गदर्शक असते तर शिक्षकांसाठी प्रभावी अध्यापनाचा पाया असते. प्रत्येक धड्याची उद्दिष्टे, संकल्पना, उदाहरणे आणि कृती यांचा क्रमबद्ध आलेख पाठ्यपुस्तकातून मिळतो. शिक्षकाला अध्यापनाचे नियोजन करणे, विद्यार्थ्यांच्या आकलनानुसार शिकवणे, आवश्यक खुणा करणे, पूरक माहिती जोडणे आणि मूल्यमापनाची तयारी करणे यासाठी पाठ्यपुस्तक सतत सोबत असणे आवश्यक असते. पुस्तक नसल्यास अध्यापनाची गुणवत्ता प्रभावित होऊ शकते. ज्या वर्गात प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक असते, तो वर्ग शिकतो; पण ज्या शिक्षकाच्या हातातही पुस्तक असते, तो वर्ग अधिक चांगल्या पद्धतीने घडतो. म्हणूनच पाठ्यपुस्तक हे केवळ विद्यार्थ्यांचे नव्हे तर शिक्षकाचेही अत्यावश्यक शैक्षणिक साधन आहे. कधी कधी विद्यार्थ्यांचे साधे प्रश्नही व्यवस्थेतील मोठ्या उणिवांकडे बोट दाखवतात. तरी याकडे दुर्लक्ष करून शिक्षक मध्य मार्ग काढत असतात.

नंतर दुर्वाचं पुस्तक घेतलं नाही पण तेच पुस्तक उलटे वाचत शिकवत होतो. विद्यार्थ्यांसाठी विविध संबोध स्पष्ट करताना ज्ञानाच्या आभाळात फरकांड्या उडवताना माझ्याच फरकांड्या मी अध्यापन करताना जुळवत होतो.



# चिंतनात्मक 'शोध आणि बोध'



**प्रा. डॉ. संदीप सांगळे**
अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
९८२२४४५१७७

**शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी संगमनेर येथे हिरालाल पगडाल लिखित 'शोध आणि बोध' या पुस्तकाचे समारंभपूर्वक प्रकाशन होत आहे. या महत्त्वपूर्ण पुस्तकाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी लिहिलेली ही आस्वादक प्रस्तावना. हे पुस्तक आपण 'चपराक'च्या संकेतस्थळावरून घरपोहोच मागवू शकाल.**


जगणे सुंदर व्हावे यासाठी आपण सगळेच अहोरात्र धडपडत असतो. मुळात सुखी, आनंदी आणि समृद्ध जीवन प्रत्येक सजीवाच्या वाट्याला यावे हा तर आपल्या सर्वांचा नैसर्गिक अधिकार आहे; परंतु सृष्टीतील प्रत्येक जीव सुखी, समृद्ध आणि संपन्न असेलच असे नाही. निसर्गाने आपल्याला भरभरून दिले आहे परंतु निसर्गाची मानवाला लाभलेली ही देण आपण कशी स्वीकारतो यावर माणसाच्या सुखाच्या कल्पना अवलंबून असतात. जीवन जगताना माणसाचे जगणे अव्याहतपणे सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर हेलकावत असते. सुखासाठी आपण अहोरात्र धडपडतो परंतु ते मिळेलच याची शाश्वती नाही. मिळालेच तर ते कायम टिकेल याचाही भरोसा नाही. मुळातच आपण जगतो कशासाठी? अर्थातच सुख-समाधान आणि आनंदासाठीच ना? आपल्या मानवजन्माचे सार्थक व्हावे हे तर प्रत्येकालाच वाटते परंतु ते होतेच असे नाही. नेमका हाच धागा पकडून श्री. हिरालाल पगडाल यांनी जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याच्या उद्देशाने काही चिंतन केले, विचार केला. अवतीभोवतीच्या अनुभवांचा संचय त्यांच्या मनी दाटला अन् त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून आणि अनुभवांच्या संकलनातून साकार झाली ती प्रत्येकाला आत्मचिंतनाकडे घेऊन जाणारी एक सुंदर कलाकृती. 'शोध आणि बोध' हे त्या ग्रंथाचे नाव.

हा चिंतन ग्रंथ 'चपराक प्रकाशन'च्या माध्यमातून आकाराला आला. महाराष्ट्रातील विविध सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांकडे सूक्ष्मतेने पाहून सातत्याने आपल्या परखड लेखणीच्या माध्यमातून ज्यांनी आपल्या खास अशा व्यक्तिमत्त्वाची ओळख निर्माण केली असे आमचे मित्र, संशोधक आणि धडाडीचे पत्रकार म्हणजे श्री. घनश्याम पाटील. 'चपराक प्रकाशन'च्या माध्यमातून महाराष्ट्रातील असंख्य लेखक, कलावंत, युवक यांना ज्यांनी लेखनाचे बळ दिले, प्रेरणा दिली, लेखन चळवळ निर्माण केली आणि 'चपराक'च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पटलावर स्वतःचे आगळे स्थान निर्माण केले असे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. घनश्याम पाटील. त्यामुळे 'चपराक प्रकाशन'च्या माध्यमातून जेव्हा एखादा ग्रंथ आकाराला येतो तेव्हा त्या ग्रंथाच्या साहित्यिक मूल्यांच्या बाबत निश्चितच महाराष्ट्रातील तमाम वाचकांच्या मनात आदराची भावना तयार होते. प्रस्तुत 'शोध आणि बोध' या ग्रंथाचे लेखक श्री. हिरालाल पगडाल हेही त्याला अपवाद नाहीत.

त्यांच्या 'शोध आणि बोध' या ग्रंथामध्ये एकूण १७ चिंतनलेखांचा समावेश आहे. भेद सारे मावळू द्या इथपासून ते सत्य, विज्ञान, शेती, राष्ट्रभक्ती, अध्यात्म ते विविध धर्मसंप्रदायांचा त्यांनी घेतलेला धांडोळा इथपर्यंत. खऱ्या अर्थाने वाचकांना चिंतनप्रवृत्त करणारे हे लेख आहेत. थोड्या अधिक प्रमाणात आपल्या सर्वांच्याच अवतीभोवती ज्या ज्या घटना, घडामोडी घडत राहतात अशा प्रत्येक गोष्टींचे प्रतिबिंब प्रस्तुत ग्रंथामध्ये पडत असल्याने वाचक, रसिक म्हणून श्री. हिरालाल पगडाल लिखित हा ग्रंथ आपल्याला आपला वाटतो. प्रस्तुत ग्रंथातील प्रत्येक लेखातील चिंतन आपल्याला अंतर्मुख केल्यावाचून राहत नाही. मुळात कोणत्याही साहित्याकडे पाहताना आपण समाजमनाचा विचार करत असतो. साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे बोलले जाते. त्यामुळे समाजाचे प्रतिबिंब ज्या साहित्यामध्ये पडते ते साहित्य वाचक, रसिकांना अंतर्मुख करते आणि ही अंतर्मुख करण्याची किमया लेखक हिरालाल पगडाल यांनी प्रस्तुत ग्रंथामधून साधलेली आहे.

देशाच्या राजधानीमध्ये युवकांनी नुकतेच मोठे आंदोलन केले. दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर इतिहास घडवणाऱ्या जेन झी पिढीने व्यवस्थेला हलवले. अहिंसा आणि संविधानाची प्रतिष्ठा वाढवणाऱ्या या तरुण पिढीला या ग्रंथाच्या प्रारंभीच लेखकाने 'शोध आणि बोध' हा ग्रंथ अर्पण केला आहे. यावरून प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाची अहिंसा आणि संविधानाप्रती असलेली ओढ अधोरेखित होते. याच भूमिकेचे प्रतिबिंब देखील 'शोध आणि बोध' या ग्रंथामध्ये पडलेले जाणवते. येथे लेखकाच्या संवेदनशील आणि तरल मनाचा प्रत्यय येतो.

सुखाच्या कल्पना आपल्याला नेहमीच आनंद देत राहतात परंतु प्रत्येक सुखाच्या पलीकडे लपलेले दुःख आपल्याला झेलावेच लागते. दुःखाशिवाय सुखाची प्राप्ती नाही. आज संपूर्ण जगच दुःखमूळ होऊन बसलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रत्येकाच्या जीवनात आनंद फुलावा यासाठी आपापल्या परीने प्रत्येकाने योगदान देण्याची भूमिका म्हणजे हिरालाल पगडाल यांचा 'शोध आणि बोध' हा चिंतन ग्रंथ होय. आपापल्या कुवतीनुसार जग दुःखमुक्त करण्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले तर जगण्याचा खरा आनंद आपल्या प्रत्येकाला घेता येईल हा आशावाद लेखक प्रस्तुत ग्रंथाच्या माध्यमातून जेव्हा व्यक्त करतात तेव्हा निश्चितच साहित्य आणि समाजाचे परस्परावलंबित्व येथे अधोरेखित होते. हिरालाल पगडाल आपल्या लेखणीच्या माध्यमातून हा संदेश देण्यामध्ये येथे यशस्वी होतात. ज्ञानेश्वरांनी संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले.




**"दुरितांचे तिमिर जावो,**
**विश्व स्वधर्म सूर्य पाहो,**
**जो जे वांछील तो ते लाहो प्राणीजात!"**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील वरील पंक्तीमध्येच विश्वाचे कल्याण सामावले आहे. नेमके हेच सूत्र 'शोध आणि बोध' या ग्रंथामधील चिंतनशील लेखनामधून लेखक हिरालाल पगडाल आपल्यासमोर मांडताना दिसतात. संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही महाराष्ट्रभूमी किती समृद्ध आहे, समाजाला योग्य दिशेने घेऊन जाण्यासाठी संत विचारच किती श्रेष्ठ आहे याचे दर्शन प्रस्तुत ग्रंथ अभ्यासताना वाचक म्हणून आपल्याला झाल्यापासून राहत नाही. आत्ममग्नतेपासून आत्मचिंतनाचा शोध घेण्यासाठी या ग्रंथाच्या प्रत्येक लेखातील विचार आपल्याला प्रवृत्त करतात. वाचकांच्या मनाचा ठाव घेतात. त्यामुळे समाज हिताचा विचार करून लेखकाने व्यक्त केलेले चिंतन खऱ्या अर्थाने मानवाच्या उन्नतीसाठी प्रेरणादायी ठरते.

अलीकडेच कोरोना काळ आपण सर्वांनी अनुभवला. सबंध मानवजातीच्या अस्तित्वाचा प्रश्न या काळात निर्माण झाला. आपल्या जीवाभावाचे अनेक लोक आपल्याला सोडून गेले. अशा परिस्थितीमध्ये आपल्या सर्वांच्याच काळजाचा ठोका चुकलेला असताना लॉकडाऊनच्या परिस्थितीमध्ये आपण सगळे निवांत घरी बसून होतो. याच वेळेचा हिरालाल पगडाल यांनी सदुपयोग केला. विविध विषयांवर चिंतन केले आणि खऱ्या अर्थाने 'शोध आणि बोध' या प्रस्तुत ग्रंथाचा लेखनप्रपंच सुरू झाला. त्यांच्या चिंतनाची प्रक्रिया सुरू झाली. खरे तर विशाल आणि अनंत ब्रह्मांडाचा विचार केला तर त्याच्या तुलनेत मानवी अस्तित्व किती नगण्य आहे याचे प्रत्यंतर लेखकाला आले. सत्ता, पद, पैसा या सगळ्याच गोष्टी नश्वर आहेत. माणसा-माणसात भेदभाव करणे चूक आहे. अमानवीय आहे. हाच धागा पकडून हिरालाल पगडाल व्यक्त झाले. त्यांची लेखणी सज्ज झाली आणि सप्टेंबर २०२१ मध्ये त्यांनी 'भेद सारे मावळू द्या' या शीर्षकाखाली चिंतन लेखमालेतील पहिला लेख लिहिला. तिथपासून ते प्रस्तुत ग्रंथातील सगळेच लेख लिहून होईपर्यंत ते थांबले नाहीत. अभ्यासपूर्ण आणि संशोधन वृत्तीचे दर्शन घडविणारे आणि त्याहीपलीकडे जाऊन मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा शोध घेणारे या ग्रंथातील लेख खऱ्या अर्थाने प्रत्येक वाचकाला चिंतन करण्यासाठी भाग पाडतात ही या ग्रंथाची महत्त्वाची उपलब्ध म्हणावी लागेल.

'सत्याचा शोध' या लेखातून लेखक विश्वाच्या विराट आणि अनंत रहस्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. या ब्रह्मांडाचा शोध कोणी लावला? ब्रह्मांडाची निर्मिती कशी झाली? असे एक ना अनेक प्रश्न मानवी मनाला सतत पडत असतात. किंबहुना कुतूहल हे आपल्या सर्वांमध्येच असते. त्यामुळे चिकित्सक दृष्टिकोन असलेला माणूस विविध रहस्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न कसा करतो याचे प्रत्यंतर वरील लेखातून आपल्याला येते.

पृथ्वीतलावरील बुद्धिवान प्राणी म्हणून माणसाची गणना होते. त्याने चंद्रावर पाऊल ठेवले. समुद्राचा तळ धुंडाळला. विविध तंत्रे आत्मसात केली. गती आणि ऊर्जा यामध्ये मानवाने प्रचंड प्रगती केली. औषधांचा शोध लावला. अशा विविध गोष्टींकडे आपले लक्ष वेधून 'जीवो, जीवस्य, जीवनम' या चिंतन लेखातून हिरालाल पगडाल आपले लक्ष वेधतात. प्रस्तुत लेखातून जीव आणि जीवनाची महती लेखक आपल्याला सांगतातच. याशिवाय मानवाच्या ठायी असलेले अफाट कौशल्य देखील ते या ठिकाणी उद्धृत करतात. यावरून लेखकाच्या जवळ असलेल्या संवेदनशीलतेचे उत्तम दर्शन याठिकाणी घडते.

'विकास मानवाचा' हा चिंतन लेख मानवी उत्क्रांती आणि प्रगत होत गेलेली मानवी अवस्था याचे सखोल दर्शन आपल्याला घडवतो. येथे लेखकाच्या चिंतनशीलतेला सलाम करावासा वाटतो. अत्यंत सखोल आणि वेगळा विचार हिरालाल पगडाल या ठिकाणी व्यक्त करतात. लेखकाच्या मते जीवसृष्टी आणि मानवी उत्पत्तीबद्दल धर्म आणि विज्ञान यांच्यात मोठी मतभिन्नता आहे. बहुसंख्य धर्मग्रंथात जीवसृष्टी आणि मानवी उत्पत्ती ही देवाची निर्मिती मानलेली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत चिंतन लेखातील विचार खऱ्या अर्थाने आपल्या सर्वांनाच दिशादर्शक ठरतात असे म्हणावेसे वाटते.

शेतीचा शोध ते जोर्वे संस्कृतीचे अतिशय सुरेख आणि अभ्यासपूर्ण दर्शन लेखकाने ग्रंथाच्या पाचव्या चिंतन पुष्पामध्ये घडविले आहे. बुद्धी आणि युक्तिच्या जोरावरच माणूस पृथ्वीतलावर टिकून आहे. शेतीचा शोध हा मानवी जीवनाच्या वाटचालीत महत्त्वाचा टप्पा. सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी शेतीचा शोध लागला आणि शेतीमुळे माणसांची भटकंती थांबली. एका ठिकाणी वस्ती करून माणूस राहू लागला, स्थिर झाला. झोपडीवजा घर बांधून शेतीजवळ राहू लागला. घर या संकल्पनेची ही सुरुवात होती. हाच धागा पकडून लेखकाने प्रस्तुत लेखामधून शेती संस्कृतीच्या वाटचालीचा सुरेख आढावा येथे घेतलेला आहे.

अग्निवर नियंत्रण मिळवणारा पृथ्वीतलावरील माणूस हा एकमेव प्राणी आहे. अग्नी निर्माण करून त्या अग्निचा हवा तसा वापर करण्याचे शास्त्र माणसाने टप्प्याटप्प्याने अवगत केले. तेव्हापासून माणूस शिजवलेले अन्न खात असल्याने त्याचे आयुर्मान देखील वाढले. या विषयाचा शास्त्रशुद्ध आढावा श्री. पगडाल यांनी 'अग्निचा शोध आणि बोध' या चिंतन पुष्पामध्ये घेतला आहे तर इतिहास आपल्याला प्रेरणा देत असतो. इतिहास हा माणसाचा तसा आवडीचा विषय. माणसे इतिहासात रमतात. त्यात आपली अस्मिता शोधतात. इतिहासातील विविध पात्रांना आपण पुन्हा पुन्हा उजाळा देत असतो. अशा परिस्थितीत इतिहासाच्या पाऊलखुणा लक्षात ठेवून आपल्याला वर्तमानात जगायचे असते. या अनुषंगाने शोध आणि बोध मधील 'मानव तितुका एकची आहे' या मथळ्याचे सातवे चिंतनपुष्प लेखकाने गुंफलेले आहे. सामाजिक न्यायाच्या चळवळीमुळे आपल्याकडील अस्पृश्यतेचे उच्चाटन झाले. त्याला ज्ञान विज्ञानातील प्रगतीसह संतांनी, समाज सुधारकांनी आणि भारतीय संविधानाने देखील मोठा हातभार लावला. तथापि व्यवहारातील अस्पृश्यतेबरोबर मनातील अस्पृश्यता देखील कमी होण्याचा आशावाद प्रस्तुत चिंतन पुष्पातून लेखक व्यक्त करतात.

'बलसागर भारत होवो' या मथळ्याखालील पुष्प आपल्याला भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाची आठवण करून देते. यावरून लेखकाच्या ठायी असलेली देशभक्ती, देशप्रेम, आत्मीयता इथे पदोपदी जाणवते.

श्री. हिरालाल पगडाल लिखित 'शोध आणि बोध' या ग्रंथातील नववे पुष्प लेखकाने स्त्रियांसाठी वाहिले आहे.

पान ८ वर ▸▸

'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा. संपर्क : ७०५७२९२०९२

# अंतरीचे कळे अंतरीलाच



मंगेश दौंडकर
भोसरी, पुणे
९८९०६१९३५४


जीवनाचा आणि मृत्युचा खेळ चालू असताना दोन अंतरांमध्ये जो संवाद घडतो, तो शब्दांच्या पलीकडचा असतो. काही नाती ही केवळ रक्ताची नसतात तर ती थेट आत्म्याशी जोडलेली असतात. जिथे शब्द अपुरे पडतात आणि अश्रू बोलू लागतात, तिथे खरी भावसंवेदना जन्म घेते. त्यातही आई आणि मुलामधला बंध असा असतो, जो शब्दांच्या आणि अगदी श्वासांच्याही पलीकडे अखंड टिकून राहतो. माझी आजी आम्हा सर्वांना सोडून अनंत प्रवासाला निघून गेली. तिच्या जाण्याने निर्माण झालेल्या अथांग पोकळीत तिचं आणि माझ्या बाबांचं नातं आठवलं की आजही मन आतून पिळवटून निघतं.

माझ्या बाबांचं माझ्या आजीवर असलेलं अथांग प्रेम मी अगदी लहानपणापासून अनुभवत आलो आहे. बाबा बँकेत नोकरीला होते पण शनिवारची दुपार झाली की जणू त्यांच्या पायांना पंख फुटायचे. आठवडाभराचा सगळा थकवा, प्रवासाचा ताण विसरून ते केवळ आईच्या भेटीसाठी गावची वाट धरायचे. गावी जाताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद एखाद्या लहान मुलासारखा ओसंडून वाहायचा. आजीचं जरा जरी काही दुखलं-खुपलं, तरी माझा बाप आतून पार कोलमडून जायचा.

साधारण वीस वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. त्यावेळी मी अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षात शिकत होतो. कॉलेजला सुट्टी असल्याने मी गावी आजीजवळच होतो. दुपारची वेळ होती. आजीच्या छातीत प्रचंड कळ उठली आणि तिला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. तिचं अंग पूर्णपणे शिथिल आणि थंड पडलं होतं. माझ्या पायाखालची जमीनच सरकली. घरात एकटाच असल्याने काय करावं, मला काही सुचत नव्हतं. तेव्हा गावी मोठी आरोग्य यंत्रणा नव्हती. ॲम्बुलन्स तर दूरची गोष्ट. शेवटी स्थानिक सरकारी डॉक्टरांच्या सल्ल्याने एका छोट्या टेम्पोमध्ये गादी अंथरून आम्ही आजीला तालुक्याच्या ठिकाणी हलविण्याचा निर्णय घेतला.

दुसरीकडे बाबा पुण्यात होते. बातमी कळताच ते जिवाच्या आकांताने धावत सुटले. रस्त्यावरचा एकही लाल दिवा त्यांना थांबवू शकला नाही. समोर काळ उभा होता आणि गाडीच्या स्टीअरिंगवर एका कासावीस झालेल्या लेकाची थरथरणारी पकड होती. ते पुण्याहून तालुक्याच्या गावापर्यंत कसे पोहोचले, हे त्यांचं त्यांनाच ठाऊक! आमची गाडी दवाखान्याच्या आवारात शिरली आणि त्याच क्षणी बाबांची गाडीही तिथे येऊन थांबली. आजीची हालचाल पूर्णपणे थांबली होती. तिने डोळे मिटले होते. आम्ही सगळे तिला हलवून जागं करण्याचा निष्फळ प्रयत्न करत होतो. डोळ्यांत साचलेले अश्रू आणि छातीत धडधड घेऊन माझे बाबा आजीजवळ पोहोचले. त्यांच्या घशातून एकही शब्द फुटत नव्हता. भरल्या कंठाने त्यांनी फक्त एकच आर्त हाक मारली... ''आई...''

त्या एका हाकेत जन्मभराची माया होती, बापाचा कासावीस झालेला जीव होता आणि आईला गमावण्याची असह्य भीती होती. पुढच्या क्षणी जे घडलं, त्याचं उत्तर आजही माझ्याकडे नाही. ज्या देहात क्षणभरापूर्वी कोणतीही हालचाल नव्हती, त्या निपचित पडलेल्या आजीनं मंदपणे आपली मान हलवून त्या हाकेला प्रतिसाद दिला! कसला हा चमत्कार? वैद्यकशास्त्र जिथे संपतं, तिथे कदाचित माय-लेकराच्या नात्याचा हा अभेद्य बंध सुरू होत असावा. तातडीने उपचार सुरू झाले आणि माझी आजी त्या संकटातून सहीसलामत बाहेर पडली. पुढेही तिला हृदयविकाराचा सौम्य झटका येऊन गेला; पण दैवाच्या कृपेने तिचं मातृछत्र आम्हाला आणखी अनेक वर्षे लाभत राहिलं.



आजीने आता वयाची नव्वदी ओलांडली होती. शरीर थकलं होतं. ''माझ्यामुळे शेवटी कोणालाही त्रास होऊ नये,'' या मतावर ती ठाम होती. शेवटच्या दिवसात तिनं स्वतःहून अन्न-पाण्याचा त्याग केला. शरीर दिवसेंदिवस क्षीण होत गेलं. घरात सगळे नातेवाईक आणि सगेसोयरे जमा झाले होते. घरभर एक शांत, अनामिक शोककळा पसरली होती. प्रत्येकाच्या मनात एकच जाणीव होती - निरोपाची वेळ जवळ आली आहे. तिन्हीसांजेची वेळ होती. सूर्य मावळतीकडे झुकला होता आणि घरभर एक उदास शांतता पसरली होती. अचानक आजीच्या कोरड्या पडलेल्या ओठांची हलकी हालचाल झाली. भरल्या डोळ्यांनी आत्याने बाबांना साद घातली... ''दादा, आई हालचाल करतेय... दोन मिनिटं बोलून बघा तरी...'' बाबा आजीच्या पलंगाजवळ गेले पण त्या क्षणी बोलण्यासाठी शब्दच उरले नव्हते. बोलणार तरी काय? कसलाही विचार न करता त्यांनी आपलं डोकं आजीच्या छातीवर टेकवलं आणि कंठ मोकळा करून लहान मुलासारखं ते ढसाढसा रडू लागले. एका सत्तर वर्षांच्या पुरुषाचा आपल्या आईच्या छातीवर टेकलेला तो माथा... आणि वाहणाऱ्या अश्रूंच्या धारा... पुढच्याच क्षणी निपचित पडलेल्या त्या थकलेल्या माउलीनं तिची उरलीसुरली सगळी ताकद एकवटली आणि एक मोठा हंबरडा फोडला!'

तो केवळ रडण्याचा आवाज नव्हता. तो त्या आईनं आपल्या लेकरांना दिलेला अखेरचा निरोप होता... ''जाऊ द्या रे बाळांनो, मला आता...'' हाच जणू तो शेवटचा संदेश होता. ते दृश्य पाहून तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाचा डोळा पाणावला. मृत्यू समोर उभा होता; पण त्या क्षणी जिंकलं होतं ते आई-मुलाच्या प्रेमाचं नातं. आम्हा कोणालाच अश्रू आवरत नव्हते.

पुढे अवघ्या पंधरा दिवसांतच आजीची प्राणज्योत मालवली पण जाताना ती आणि माझ्या बाबांनी मला नात्याचं एक महान सत्य शिकवलं. आपण आयुष्यभर पैसा, संपत्ती आणि करिअरच्या मागे धावत राहतो. या शर्यतीत नकळत आपलं घर मागे पडतं. गावी असणारे वृद्ध आई-वडील दिवसेंदिवस एकाकी होत जातात. आपण त्यांना पैसे पाठवतो; पण त्यांना पैशांपेक्षा जास्त गरज असते ती आपल्या सहवासाची, आपल्या दोन प्रेमाच्या शब्दांची आणि आपल्या स्पर्शाची. कारण आई-वडील हे या जगातील सर्वांत मोठं जिवंत दैवत आहेत. ते आपल्या आयुष्यात आहेत, तोपर्यंतच आपल्या जगण्याला अर्थ असतो. ते निघून गेल्यावर कितीही पैसा, कितीही संपत्ती आणि कितीही यश मिळालं, तरी मनाच्या एका कोपऱ्यात निर्माण झालेली ती उणीव आयुष्यभर भरून निघत नाही. म्हणून... ते आहेत तोपर्यंत त्यांना वेळ द्या. त्यांच्यासोबत बसा. त्यांचे हात हातात घ्या. त्यांच्या प्रेमाची ऊब मनभर साठवून ठेवा कारण त्यांच्या जाण्यानंतर उरतात

# चिंतनात्मक 'शोध आणि बोध'

◀◀ पान ७ वरून

स्त्री ही देवी नाही आणि दासीही नाही. ती फक्त आणि फक्त माणूसच आहे. मात्र वस्तुस्थिती तशी नाही. ती खूपच विदारक आहे. या ज्वलंत प्रश्नाकडे लेखकाने वेधलेले लक्ष समाजव्यवस्थेला आत्मचिंतनाच्या प्रक्रियेकडे घेऊन जाते.

प्राचीन, बहुआयामी आणि गुंतागुंतीची संकल्पना म्हणजे धर्म. शोध आणि बोधमधील एक चिंतनपुष्प लेखकाने याच विषयाला वाहिलेले आहे. धर्म ही संकल्पना मानवाच्या उत्क्रांतीशी निगडित आहे. माणसाला संयम, करुणा आणि सहकार्य शिकवणारा धर्मच असतो. लेखक हिरालाल पगडाल यांचे धर्माविषयीचे हे मत सबंध समाजव्यवस्थेच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालते असे म्हटले तर मुळीच वावगे ठरणार नाही.

एकूणच प्रस्तुत ग्रंथातील सतरा चिंतन पुष्पांमध्ये आपल्याला सबंध मानव जातीच्या जन्माचे सार एकवटल्याचा प्रत्यय येतो. लेखक हिरालाल पगडाल यांच्या या लेखनप्रपंचाला सलाम करावा तेवढा थोडाच आहे... काय नाही या ग्रंथामध्ये? जीवन, वैराग्य, त्याग, संस्कृती, समाज, शेती, रुढी परंपरा, सण उत्सव, धर्म संस्कृती, देशभक्ती, वैज्ञानिक शोध, भारतीय ज्ञान परंपरा इत्यादी गोष्टींचा सुरेख संगम म्हणजे हिरालाल पगडाल यांचा 'शोध आणि बोध' हा ग्रंथ होय. श्री. पगडाल यांची सिद्धहस्त लेखणी आणि विचार चिंतन यापुढील काळात असेच सातत्याने बहरत राहो, मराठी वाङ्मयाच्या देदीप्यमान वाटचालीमध्ये लेखकाच्या लेखनाद्वारे मौलिक भर पडो आणि खऱ्या अर्थाने समाजहिताचा विचार करून समाजाला दिशा देणारे साहित्य निर्माण होवो हीच सद्भावना! श्री. हिरालाल पगडाल यांच्या पुढील वाङ्मयीन वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

मासिक 'साहित्य चपराक'
पान अन् पान वाचनीय; प्रत्येक अंक संग्राह्य!
माहिती, मनोरंजन आणि ज्ञानाचा खजिना



वार्षिक वर्गणी - रु. १०००/-
दिवाळी अंकासह ११ अंक घरपोच
आजच सभासद व्हा!
वर्गणी भरण्यासाठी क्यू आर
बँकेचा तपशील
CHAPRAK PRAKASHAN
HDFC BANK, SUVARNAYUG SAHAKARI BANK LTD
Account No. : 003002100001535
IFSC code : HDFC0CSUVRN
www.chaprak.com
वर्गणी पाठवल्यानंतर त्याचा तपशील, आपले नाव आणि पिनकोडसहित पूर्ण पत्ता ७०५७२९२०९२ या क्रमांकावर व्हाट्सअॅप करावा.